**A**

# Minor Research Project

in the subject of Marathi

Entitled

# Ambedkari Jalsakar Haribhau Torne : Vyakti ani Vadmay

Submitted to

**University Grant Commission**

**Western Regional Office**

Pune University Campus,

Ganeshkhind, Pune

By


**Dr. Sariputra Ajinath Tupere**

M.A.Ph.D.,SET, NET(JRF) Marathi, M.A. Philosophy

Assistant Professor, Department of Marathi

**Sangameshwar College, Solapur**


## Solapur University, Solapur

**December, 2017**

# SUMMARY OF THE FINDINGS

भारतीय इतिहासामध्ये आंबेडकरी चळवळीचा क्रांतिकारक इतिहास आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या प्रभावी व्यक्तिमत्व आणि कुशल नेतृत्वाच्या माध्यमातून सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक पातळीवर निर्णायक चळवळ निर्माण करुन युगप्रवर्तक असे कार्य केले. बाबासाहेबांच्या या क्रांती लढ्यात अनेक निष्ठावान शिलेदार होते. ज्यांनी आपले सबंध आयुष्य आंबेडकरी चळवळीला वाहून घेतले. अंतिम क्षणापर्यंत बाबासाहेबांच्या विचारकार्याला प्रवाहित केले. त्यामधील एक महत्त्वाचे शिलेदार म्हणजे आंबेडकरी जलसाकार हरी भाऊ तोरणे हे होत.

प्रस्तुत शोध प्रकल्पामध्ये **आंबेडकरी जलसाकार हरी भाऊ तोरणे : व्यक्ती आणि वाङ्मय** या विषयांतर्गत हरिभाऊंच्या जीवनकार्याचा शोध घेण्याचा अभ्युपगम स्वीकारलेला होता. त्याच्या पूर्ततेसाठी सदर विषयाची प्रकरणनिहाय मांडणी **१. भूमिका २. हरी भाऊ तोरणे यांचे जीवन व कार्य ३. आंबेडकरी जलसाकार हरी भाऊ तोरणे ४.भीमभूपाळीकार कवी हरी भाऊ तोरणे ५. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि हरी भाऊ तोरणे यांच्यातील पत्रव्यवहार ६. हरी भाऊ तोरणे यांचे योगदान.** याप्रकारे केली. या सर्व प्रकरणामधून हरी भाऊ तोरणे यांचे जीवन, कार्य आणि लेखन याविषयीचा शोध घेतलेला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील मेडद (माळशिरस) येथे दि. १७ जुलै १८९२ रोजी हरी भाऊ तोरणे यांचा जन्म झाला. अत्यंत कष्टात त्यांनी शिक्षण घेतले. पुणे, कसबे तडवळे, पंढरपूर, सोलापूर याठिकाणी त्यांनी शिक्षक म्हणून नोकरी केली. त्यांना तोरणे गुरूजी म्हणून सर्वत्र ओळखले जात असे. क्रांतिबा जोतीराव फुले यांच्या चळवळीत हरिभाऊंनी प्रारंभी कार्य केलेले होते. आपल्या सत्यशोधकी लेखनातून समाजप्रबोधन करण्याचा त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केलेला होता. राजर्षी शाहू महाराजांनी त्यांना शैक्षणिक कार्यासाठी मदत केलेली होती. फुले - शाहू - आंबेडकरी चळवळीतील एक शिलेदार म्हणून त्यांनी केलेले कार्य महत्त्वाचे आहे. त्यामुळे आंबेडकरपूर्व दलित चळवळीतील एक खंदे कार्यकर्ते म्हणून त्यांना ओळखले जात होते. त्यांचे निधन दि. १७ जुलै १९६७ रोजी मेडद येथे झाले.

हरिभाऊंनी आपल्या जीवनात शिक्षक म्हणून काम करताना जलशांच्या माध्यमातून लोकप्रबोधनाचे ही कार्य केलेले आहे. विशेषत: त्यांनी सत्यशोधकी साहित्याचे लेखन केले. श्री चोखामेळा महाराजांची पंढरपूरवर स्वारी, चावडीतील बैठक ही त्यांची गाजलेली पुस्तके आहेत. सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांच्या दीनमित्र या साप्ताहिकात त्यांनी काठीचे सपाटे हे स्फूट लेखन केलेले आहे. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मुकनायक, जनता या पत्रांमध्येही त्यांचे काव्य प्रसिध्द झालेले आहे. भीमभूपाळी ही कविता बाबासाहेबांच्या व्यक्तित्व आणि कर्तृत्वाचा आलेख मांडणारी अप्रतिम कविता हरिभाऊंनी लिहिली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि हरिभाऊ तोरणे यांच्यातील ऋणानुबंध अतिशय घनिष्ठ होते. एकमेकांविषयी त्यांना प्रचंड आदर होता. हा आदर या दोघांमधील झालेल्या पत्रव्यवहारातून आविष्कृत होतो. बाबासाहेब त्यांना कधीच एकेरी नावाने बोलवत नसत. स्वत: बाबासाहेबांनी ता. २२/९/१९२४ च्या पत्रात म्हटलेले आहे की, आपलीही प्रकृती बरी नव्हती हे ऐकून वाईट वाटत होते. कारण आमच्यातील सामाजिक चालकांपैकी आपण अग्रगण्य आहात. अशांच्या प्रकतिस स्वास्थ नसेल म्हणजे एक समाजावर आपत्तीच आहे. हा जिव्हाळाच हरिभाऊंच्या आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्तृत्वास प्रेरक ठरला. आणि त्यांनी बाबासाहेबांचे नेतृत्व मान्य करुन कार्य केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे क्रांतिकारक नेतृत्वाने जो नवा इतिहास निर्माण केला. त्याला भीमक्राती असे म्हटले गेले. या भीमक्रांतीचे जे अनेक शिलेदार होते त्यामध्ये एक नाव म्हणजे हरी भाऊ तोरणे होय. म्हणूनच ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत आप्पासाहेब रणपिसे यांनी हरिभाऊंचा उल्लेख " भीमक्रांतीच्या संग्रामातील गरनाळी तोफ " अशा शब्दात केलेला आहे. यावरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतील हरिभाऊंचे योगदान अतिशय महत्त्वपूर्ण आहे. हे आपल्या लक्षात येते. आंबेडकरी चळवळीला वैचारिक अधिष्ठान देणारा एक विचारवंत, कवी, लेखक, जलसाकार म्हणून हरी भाऊ तोरणे ओळखले जातात. प्रस्तुत शोध प्रकल्पात त्यांच्या कार्यकर्तृत्वाची, शैक्षणिक, सामाजिक, वाङमयीन स्वरूपाची ऐतिहासिक मांडणी केलेली आहे. त्यामुळे हा प्रकल्प आंबेडकरी चळवळीचा ऐतिहासिक दस्ताऐवज ठरेल अशी आशा वाटते.